## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय,लातूर.

ग्राहक तक्रार क्रमांक : ०२/२०१७
ग्राहक तक्रार दाखल दिनांक :०३.०१.२०१७

**मे- इंडस टॉवर्स लि.**
२०१०, ई-कोर, दुसरा मजला,
मार्वल एज, विमान नगर, पुणे - ४११०१४. -- ग्राहक अर्जदार

-- विरुध्द

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष,उस्मानाबाद** -- गैरअर्जदार

**कोरम :**

| | |
|---|---|
| | अध्यक्ष |
| श्री मोहम्मद कासिम बावला | सदस्य |
| श्री आर. जी. कोलप | सदस्य/सचीव |

## निकाल

दि. २८.११.२०१७

ग्राहक अर्जदार, मे. इंडस टॉवर्स लि. पुणे बावी ता.उस्मानाबाद यांनी त्यांची तक्रार 'अ' फॉर्ममध्ये दि.०३.०१.२०१७ रोजी ग्राहक तक्रार निवारण मंच लातुर येथे दाखल केली.

ग्राहक अर्जदाराचे गाऱ्हाणे/तक्रार असे आहे की, ग्राहक क्र. ६०६२५०६१९४४३ चा विद्युत पुरवठा हा दिनांक २०.०९.२०१६ रोजी सुमारे सकाळी १०.०० वाजलेच्या दरम्यान कोणतीही पुर्व सुचना न देता कायमस्वरुपी बंद करण्यात आला. की ज्यावेळेस Dispute बिला बद्दलची तक्रार उपविभाग अधिकारी वाशी यांच्याकडे प्रलंबित होती.

ग्राहक अर्जदाराची 'अ' फॉर्ममधील तक्रार प्राप्त झाल्यानंतर गैरअर्जदार/महावितरण कंपनी यांना त्यांचे लेखी म्हणणे देण्याविषयी पत्र दिले. त्यानुसार महावितरण कंपनीतर्फे लेखी म्हणणे पत्र क्र. Se/O'bad/Ts/1133 दि.20.02.2017 रोजी मंचात सादर करण्यात आले.

सदर केसची सुनावणी दि.२२.०३.२०१७; २६.०४.२०१७; १२.१०.२०१७ रोजी घेण्यात आली. ग्राहक अर्जदारतर्फे ग्राहक प्रतिनिधी श्री डी. एस. तलवारे व महावितरणतर्फे उपकार्यकारी अभियंता वाशी, श्री शेंद्रे तसेच सहाय्यक लेखापाल श्री मुलानी, हजर होते.

श्री तलवारे ग्राहक प्रतिनिधी यांनी मंचासमोर असे सांगितले की, आम्ही मार्च १६ पर्यतची सर्व बिले भरली आहेत. तसेच आम्ही वेळेवर बिले भरणारे ग्राहक आहोत. दि.११.०४.२०१६ रोजी फिरते पथक उस्मानाबाद यांनी सदर ग्राहकाची स्थळ तपासणी करुन Meter Display बंद असल्याचे आम्हाला कळवले